# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार

दि.२०/०१/२०२४

**वसई विरार शहर महानगरपालिकेत राबविण्यात आली सखोल स्वच्छता मोहीम (Deep Cleaning Campaign)**

स्वच्छ भारत अभियान, माझी वसुंधरा आणि राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम (NCAP) या संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार दि.२० जानेवारी २०२४ पासून वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सखोल स्वच्छता मोहीमेचा (Deep Cleaning Campaign) शुभारंभ प्रभाग समिती 'ए' बोळींज कार्यक्षेत्रापासून करण्यात आला. शनिवार, दि.२०/०१/२०२४ रोजी "गोकुळ टाऊनशीप गेट, पोलीस बीट चौकीजवळ, बोळींज, विरार (पश्चिम)" या ठिकाणी सकाळी ०७.०० वाजेपासून या मोहिमेला सुरुवात करण्यात आली. प्रभागाच्या हद्दीतील गावठण, विराट नगर, बोळींज नाका ते राम मंदीर, बोळींज नाका ते खारोडी गाव, जकात नाका ते म्हाडा, जकात नाका ते मानसी मल्लीका शॉप, गोकुळ टाऊनशिप, खारोडी नाला ते जकात नाका (पराग मेडीकल), जकात नाका ते विवा कॉलेज, विजय वल्लभ हॉस्पिटल ते न्यु विवा कॉलेज, पेट्रोल पंप ते कलावती मंदीर ते विवा कॉलेज या ठिकाणचे मुख्य रस्ते, उप-रस्ते, फुटपाथ इ.ची साफसफाई करण्यात आली तसेच ते पाण्याने स्वच्छ धुण्यात आले.

या मोहिमेत महानगरपालिकेतील अधिकारी, कर्मचारी, स्वच्छता दूत, विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, शालेय विद्यार्थी, विविध सेवाभावी संस्थांचे प्रतिनिधी, मान्यवर नागरिक इ.यांनी सहभाग घेतला.

सदर सखोल स्वच्छता मोहीम ही महानगरपालिका क्षेत्रात दर शनिवारी सकाळी ०७ ते ११ या वेळेत प्रभाग निहाय टप्प्याटप्प्याने राबविण्यात येईल व मोहीम अशीच पुढे सुरु राहील.

मुख्य कार्यालय विरार
वसई विरार शहर महानगरपालिका